लोकमत

# बीजेएमजेसह विविध फेरप्रवेश परीक्षा गुरुवारपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने बीजे, एमजेसह विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे सुधारित वेळापत्रक सोमवारी जाहीर केले त्यानुसार दि. १० जुलैपासून विविध विषयांच्या परीक्षा होणार आहेत.

विद्यापीठाने विविध अधिविभागातील जागा रिक्त राहील्याने पुन्हा प्रवेश परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार विद्यापीठाने सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले. दि. १० जुलैला सकाळी १०.३० ते १२ , दुपारी १ ते २.३० तसेच दुपारी ३.३० ते ५ यावेळेत विविध विषयांच्या फेर प्रवेश परीक्षा होणार आहेत. एमए (रशियन) विषयाची प्रवेशपरीक्षा दु २.३० ते ५.३० यावेळेत होईल.

तरुण भारत

# प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक जाहीर, १० रोजी परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे (री-एंट्रस) सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार १० जुलै रोजी विविध विषयांच्या परीक्षा होणार आहेत.

विद्यापीठाच्यावतीने विविध अधिविभागातील रिक्त जागा पुन्हा प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला आहे. काही अभ्यासक्रमांना अत्यल्प प्रवेश झाले आहेत. त्यानुसार विद्यापीठाने ७ जुलै रोजी प्रवेश परीक्षांचे सुधारित वेळापत्रक प्रसिध्द केले आहे. विविषयाच्या परीक्षा १० जुलै रोजी सकाळी १०.३० ते १२, १ ते २.३०, ३.३० ते ५ , २.३० ते ५.३० यावेळेत विषयानुसार होणार आहे.

सकाळ

# २६ अभ्यासक्रमांसाठी होणार पुनर्प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील विविध २६ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी गुरुवारी (ता. १०) तीन सत्रांमध्ये पुनर्प्रवेश परीक्षा होणार आहे. विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये परीक्षा केंद्र आहे.

विद्यापीठाने २८ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेऊन पुढील प्रक्रिया राबविली. मात्र, जागा रिक्त राहिल्याने त्यापैकी २६ अभ्यासक्रमांसाठी गुरुवारी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात पुनःर्प्रवेश परीक्षा आयोजित केली आहे. त्यात सकाळी साडेदहा ते दुपारी बारा यावेळेत एम. एस्सी. केमिस्ट्री, तर दुपारी एक ते अडीच यावेळेत एम. एस्सी. स्टॅस्टिक, मायक्रोबायोलॉजी, मॅथेमेटिक्स, जिऑग्राफी, बी.लिब., एम. ए. ट्रॅव्हल अँड टुरिझम, मास कम्युनिकेशन, एम. एस्सी. बॉटनी, झूलॉजी, फिजिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, ॲग्रो केमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, पर्यावरणशास्त्र या अभ्यासक्रमांची परीक्षा होईल. दुपारी साडेतीन ते सायंकाळी पाच यावेळेत बी. जे., एम.जे., एम.एस्सी. जिओ इन्फॉर्मेटिंग, एमबीए., एमएसडब्ल्यू, एम.टेक., एम.एस्सी. नॅनो सायन्स, योगशास्त्र, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, बायोकेमिस्ट्री आणि दुपारी अडीच ते सायंकाळी साडेपाच यावेळेत एम.ए. रशियन अभ्यासक्रमाची परीक्षा होणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे गुरुवारी विविध विषयांच्या प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचे (री-एंट्रस) सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार १० जुलै रोजी विविध विषयांच्या परीक्षा होणार आहेत. काही अभ्यासक्रमांना अत्यल्प प्रवेश झाले आहेत. त्यानुसार विद्यापीठाने ७ जुलै रोजी प्रवेश परीक्षांचे सुधारित वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. १० जुलै रोजी एम.एस्सी. (केमेस्ट्री- सर्व विषय) सकाळी १०.३० ते १२ यावेळेत होणार आहे. एम.एस्सी. (संख्याशास्त्र, गणित, भूगोल, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, पदार्थविज्ञान, पर्यावरणशास्त्र, एजीपीएम) तर बी.लिब अँड इन्फॉर्मेशन सायन्स, एमए (ट्रॅव्हल अँट टुरिझम), एमए (मास कम्युनिकेशन) विषयांची प्रवेश परीक्षा १ ते २.३० यावेळेत होईल. बॅचलर ऑफ जर्नालिझम (बीजे), मास्टर ऑफ जर्नालिझम (एमजे), एमबीए, एम.टेक (वायसीएसआरडी), एम.एस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), एमए (योगशास्त्र), एम.एस्सी. (फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी), एम.एस्सी. (संगणकशासत्र), एम.एस्सी. (बायोकेमेस्ट्री, बायोटेक्नॉलॉजी) विषयांची परीक्षा ३.३० ते ५ यावेळेत होणार आहे. एमए (रशियन) विषयाची प्रवेश परीक्षा शिवाजी विद्यापीठातील परदेशी भाषा विभागात दुपारी २.३० ते ५.३० यावेळेत होणार आहे.

07 JUL 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माध्यम, अभिव्यक्ती साक्षरता ही काळाची गरज

## डॉ. अशोक चौसाळकर : डॉ. आलोक जत्राटकर यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : 'सध्या समाजमाध्यमांच्या आगमनामुळे विद्वेषी, विखारी, भेदाभेदाला बळ देणाऱ्या खालच्या दर्जाच्या अभिव्यक्तींचे वाढते प्रमाण चिंताजनक आणि देशहिताला मारक आहे. त्यामुळे माध्यम आणि अभिव्यक्ती साक्षरता ही काळाची गरज आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी शनिवारी येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर लिखित 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' व 'समाज आणि माध्यमं' या पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून भाग्यश्री कासोटे-पाटील, रघुनाथ कडाकणे, पी. एस. पाटील, अशोक चौसाळकर, डॉ. जत्राटकर, अमेय जोशी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्या 'ब्लॅक, व्हाईट अन् ग्रे' हा भाग्यश्री प्रकाशनातर्फे प्रकाशित होणारा मुक्तचिंतनपर ललित लेख संग्रह आणि 'समाज आणि माध्यमं' हे अक्षर दालन प्रकाशनातर्फे प्रकाशित होणारे माध्यमविषयक पुस्तक यांचे संयुक्त प्रकाशन येथील राजर्षी शाहू सभागृहात झाले. त्यावेळी 'समाज, माध्यमं आणि संविधानिक मूल्ये' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. रघुनाथ कडाकणे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'स्वच्छ अभिव्यक्ती ही आजची गरज आहे. आद्य मराठी संपादक बाळशास्त्री जांभेकर यांनी त्यासाठी आग्रही प्रतिपादन केले होते. भारतीय संविधानही त्याच अभिव्यक्तीची अपेक्षा नागरिक, माध्यमकर्मीकडून बाळगते. त्यामध्येही माध्यमांना मोलाची भूमिका बजावण्याची संधी आहे. माध्यम हे दुधारी असते. माध्यमकर्मींनी व्यापक सामाजिक हितासाठी त्याचा अत्यंत जबाबदारपूर्वक वापर केला पाहिजे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'समाज आणि माध्यमं या पुस्तकातून डॉ. जत्राटकर यांनी नवमाध्यमांतील त्रुटींची अतिशय परखडपणे जाणीव करून दिली आहे. समाजाविषयीची चिंता, तळमळ त्यामध्ये आढळते.'

या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. चौसाळकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीप लोंढे, संजय पाटोळे, डॉ. विजय चोरमारे यांचा सत्कार कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. पाटील, डॉ. कडाकणे, डॉ. जत्राटकर यांनी मनोगत व्यक्त केले. भाग्यश्री कासोटे पाटील यांनी स्वागत केले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार, डॉ. ओमप्रकाश कलमे, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, एन. डी. जत्राटकर, सागर डेळेकर, जगन कराडे, बी. एम. हिर्डेकर, जी. पी. माळी, इस्माईल पठाण आदी उपस्थित होते. जयश्री देसाई यांनी सूत्रसंचालन केले. अमेय जोशी यांनी आभार मानले.